दै. अग्निक एकसूत्र दि. १८.१०.२५

# नांदेड पोलिसांची कामगिरी २६ गुन्हेगार ताब्यात



**नांदेड (प्रतिनिधी)-जिल्ह्यातील गुन्हेगारांवर वारंवार प्रतिबंधात्मक कारवाई करून देखील त्यांच्या वर्तनात सुधारणा होत नसल्याने सर्व पोलीस ठाणेदारांकडून सराईत गुन्हेगारांवर एमपीडीए प्रस्तावाची कारवाई चालू आहे. चालू वर्षात गेल्या १० महिन्यात २६ सराईत गुन्हेगारांना स्थानबद्ध करण्यात आले आहे. तर १४ ऑक्टोबर रोजी जिल्हा दंडाधिकारी यांच्या आदेशान्वये आणखी एकाची हसूल कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.**

जिल्ह्यातील गुन्हेगारांवर वारंवार प्रतिबंधात्मक कारवाई करून देखील त्यांच्या वर्तनात सुधारणा होत नसल्याने सर्व पोलीस ठाणेदारांकडून सराईत गुन्हेगारांवर एमपीडीए प्रस्तावाची कार-वाई चालू आहे. चालू वर्षात गेल्या १० महिन्यात २६ सराईत गुन्हेगारांना स्थानवद्ध करण्यात आले आहे.

तर १४ ऑक्टोवर रोजी जिल्हा दंडाधिकारी यांच्या आदेशान्वये आणखी एकाची हसूल कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.शहरात तसेच जिल्ह्यामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यातील गुन्हे अभिलेखावरील सक्रिय तसेच वारंवार गुन्हे करणाऱ्या सराईत आरोपींची यादी तयार करून आरोपीविरुद्ध [illegible] करण्यासंबंधी सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना जिल्हा पोलीस अधीक्षकांनी सूचना दिल्या आहेत. त्यानुसार वसरणी येथील रहिवासी सराईत गुन्हेगार वि-वेक विद्यासागर गजभारे याच्याविरुद्ध अवैधरित्या शस्त्र वाळगणे, त्याचा वापर करणे, दुखापत करणे, गंभीर दुखापत करणे,जवरी चोरी करणे असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.त्यामुळे ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी उपरोक्त गुन्हेगारास एमपीडीए अधिनियमाप्रमाणे स्थानवद्ध करण्यावावतचा प्रस्ताव जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे सादर केला होता. जिल्हा पोलीस अधीक्षकांनी एमपीडीए प्रस्तावा मधील गुन्हेगारास एक वर्षाकरिता स्थानवद्ध करण्यावावतची शि-फारस जिल्हा दंडाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे केली होती. त्या अनुषंगाने जिल्हा दंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी उपरोक्त सराईत गुन्हेगारास एक वर्षाकरिता छत्रपती संभाजी नगर येथील हर्सल कारागृहात स्थानवद्ध करण्यावावतचे आदेश १४ ऑक्टोवर रोजी पारित केले. गुन्हेगारास ताव्यात घेऊन कारागृहामध्ये बंद करण्याची प्रक्रिया सुरू होती. दरम्यान, २०२५ या चालू वर्षामध्ये २६ सराईत गुन्हेगारांना कारागृहामध्ये स्थानवद्ध करण्यात आले आहे.विशेष पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप आणि पोलिस अधीक्षक अविनाश कुमार यांनी अवैध धंद्याविरोधात कारवाईची मोहिम हाती घेतली आहे. या अंतर्गत सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात येत आहेत. वारंवार गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांवर स्थानवद्ध तर काहींवर जिल्ह्यातून हद्दपार करण्याची कारवाई करण्यात येत आहे. तर शहरातही सिटी सेफ्टी अंतर्गत कारवाई सुरू आहे.